**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २४ मार्च २०२५**

**ठळक बातम्या**

1. **२० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करण्याचं राज्य सरकारचं धोरण नाही- राज्य सरकार तर्फे विधानसभेत स्पष्टोक्ती.**
2. WAVES Anime & Manga Contest **स्पर्धा उद्या नागपूरच्या जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट इथं होणार.**
3. **नागपूर हिंसाचार प्रकरणातला प्रमुख आरोपी फहीम खान याचे अनधिकृत घर मनपा अतिक्रमण विरोधी पथकाने पाडले.**
4. **'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या संकल्पनेला पाठबळ देण्याकरीता नागपूर महानगर पालिका शाळेतील विद्यार्थीनींना मिळणार वर्षाला ४ हजार रुपये.**
5. **क्षयरोग रुग्णाविषयी डॉक्टरांनी संवेदनशील असण्याची गरज - महानगरपालिका वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ.दिपक सेलोकर.**

---

**२० पेक्षा कमी पॅट संख्या**

**२० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा बंद करण्याचं राज्य सरकारचं धोरण नाही, तसा शासन निर्णय निर्गमित केलेला नाही, असं राज्य सरकारने आज विधानसभेत स्पष्ट केलं. राज्यातल्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा आणि आवश्यक गोष्टी उपलब्ध करून देण्यासाठी शाळा दत्तक योजना राबवली जात आहे. त्यात दानशूर व्यक्ती, स्वयंसेवी संस्था, कंपन्यांकडून आर्थिक मदत घेतली जाते. त्यामुळे १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळा बंद तसंच मराठी शाळा बंद होण्याचा प्रश्न नसल्याचं शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी लेखी उत्तरात सांगितलं. राज्यातल्या शाळा दुरुस्तीचा आराखडा लवकरच तयार करू आणि त्यासाठी अर्थसंकल्पात तरतूद करू असं आश्वासन शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी दिलं.**

---

**कुणाल कामरा**

हास्य कलाकार कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याविषयी केलेल्या वक्तव्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निषेध केला आहे. आज विधीमंडळ परिसरात वार्ताहरांशी बोलताना त्यांनी, कोणत्याही नेत्याचा अनादर करणं सहन केलं जाणार नाही, कोणालाही स्वातंत्र्याचा गैरवापर करता येणार नाही, असं स्पष्ट केलं.

*स्टँड अप कॉमेडी करण्याचा कोणालाही अधिकार आहे, पण स्वातंत्र्याचा स्वैराचार करण्याचा अधिकार कोणालाही नाहीये. खालच्या दर्जाची कॉमेडी करून, राज्यातले माजी मुख्यमंत्री, आताचे उपमुख्यमंत्री राज्यातले वरिष्ठ नेते ज्यांच्याबद्दल राज्यातल्या जनतेमध्ये आदर आहे त्यांच्याबद्दल अशा प्रकारचा अनादर करण्याचा कोणालाही अधिकार नाही हे, अत्यंत चुकीच आहे तुम्ही करा व्यंग करा पण पण अपमानित करण्याचं काम जर कोणी करेल तर हे सहन केलं जाणार नाही हे अतिशय चुकीचे आहे.*

कामरा यांनी माफी मागावी, अन्यथा कारवाई करण्याचा इशारा मुख्यमंत्र्यांनी दिला आहे. हास्यकलाकार कुणाल कामराने त्यांच्या कार्यक्रमात कोणाचही नाव घेतले नाही तरीही एकनाथ शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनी ती टीका स्वतःवर ओढवून घेऊन तोडफोड केली अशी टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली.

-----------------------------

वेव्ज नागपूर

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या सहकार्याने, मीडिया अँड एंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडिया नागपूरमध्ये WAVES Anime & Manga Contest स्पर्धा संपन्न होणार आहे. क्रिएट इन इंडिया उपक्रमांतर्गत भारताच्या क्रिएटर इकॉनॉमीला चालना देण्याचे आणि वेबटूनमधील स्थानिक प्रतिभेला प्रोत्साहन देण्याचे उद्देश्य या कार्यक्रमाचे आहे. हा कार्यक्रम उद्या, २५ मार्च मंगळवार रोजी नागपूरच्या जी.एच.रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे सकाळी 9 ते सायंकाळी 6 दरम्यान होणार आहे. या कार्यक्रमात शेकडो प्रतिभावान कलाकार, ॲनिमेटर आणि कंटेंट क्रिएटर्स सहभागी होणार आहे. जपानी-शैलीतील कॉमिक्स-मंगा; डिजिटल कॉमिक्स- वेबटून; जपानी-शैलीतील ॲनिमेशन-ॲनिमे आणि कॉस्प्ले स्पर्धा नागपुरात होणार आहे. स्पर्धांव्यतिरिक्त, उपस्थितांना भारतातील उदयोन्मुख ॲनिमे आणि मंगा उद्योगाबद्दल विशेष माहिती मिळेल, आणि आघाडीच्या व्यावसायिकांशी संवाद साधता येईल आणि वाढत्या AVGC-XR अर्थात Animation, Visual

Effects, Gaming, Comics & Extended Reality) क्षेत्रातील नवीन संधींचा शोध घेता येईल. या स्पर्धेची नोंदणी मोफत असून उद्या सकाळी 9 पासून कार्यक्रमाला सुरवात होणार आहे. सायंकाळी 4 ते 6 दरम्यान पुरस्कार वितरण होईल अशी माहिती या कार्यक्रमाचे आयोजक मीडिया आणि इंटरटेनमेंट असोसिएशन ऑफ इंडियाचे सचिव अंकुर भसिन यांनी दिली आहे. दरम्यान, डब्ल्यूएएम! च्या मागील आवृत्त्यांचे गुवाहाटी, कोलकाता, भुवनेश्वर, वाराणसी दिल्ली तसेच मुंबई येथील विसलिंग वुडस येथे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

----------------------------

उपाध्यक्ष पदाची निवडणूक

विधानसभा उपाध्यक्ष पदाची निवडणूक २६ मार्च रोजी होणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली. यासाठी उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत विधानसभा सचिवांकडे अर्ज सादर करता येतील, असं त्यांनी सांगितलं.

----------------------------

फहीम खान अनधिकृत बांधकाम

नागपूर हिंसाचार प्रकरणातला प्रमुख आरोपी फहीम खान याचं दुमजली घर पाडण्यात आलं आहे. काही दिवसांपूर्वी नागपूर महानगरपालिकेने खान याच्या घराचा इमारत आराखडा मंजूर नसल्यामुळे त्याचं घर अनधिकृत असल्याच्या कारणामुळे नोटीस बजावली होती. आज सकाळी पालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकातर्फे खानच्या घरावर कारवाई केली. या संपूर्ण परिसरात पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंदोबस्तासाठी एक पोलीस उपायुक्त, दोन एसीपी, पंधरा पोलीस अधिकारी, १५० पोलीस कर्मचारी, २ एसआरपी प्लाटून तसेच आरसीपीचे प्लाटून बंदोबस्त ठेवण्यात आला अशी माहिती गुन्हे शाखेचे अपर पोलीस आयुक्त संजय पाटील यांनी दिली. १७ मार्च रोजी औरंगजेबाच्या कबरीसंदर्भात पसरलेल्या अफवेमुळे हिंसाचार झाला होता. या हिंसाचारात १०० हून जास्त जणांना अटक करण्यात आली असून फहीम हा या प्रकरणाचामुख्य आरोपी आहे.

----------------------------

हवामान केंद्रात प्रदर्शनी

हवामानाबद्दल नागरिकांना तसेच विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, त्यांच्यात जनजागृती यावी या उद्देशाने जागतिक हवामान दिना निमित्य नागपुरातील प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरच्या वतीने एका प्रदर्शनीचे आयोजन करण्यात

आलेले असून या प्रदर्शनीचे उदघाटन प्रादेशिक हवामान केंद्र नागपूरचे प्रमुख आणि वैज्ञानिक आर. बाला. सुब्रमनियम यांच्या हस्ते करण्यात आले. थर्मामिटर, वारा दिशा दर्शक यंत्र, पर्जन्यमापक, स्वयंचलित सेन्सर तसेच हवामान संदर्भात माहिती देणारे यंत्र या प्रदर्शनात ठेवण्यात आलेले आहेत. यंदाच्या संकल्पने बाबत आर.बाला.सुब्रमनियम यांनी अधिक माहिती दिली आहे

*इस साल का जो थीम है क्रॉसिंग द अर्ली वॉर्निंग गॅप टुगेदर म्हणजे, जो इसका मतलब है, जो हम जो पूर्व अनुमान देते है, चेतावणी करते है, मौसम का दुर्घटना का, जो इंसानो को बचाना है, लेकिन इंसान जो आगे आगे जानकारी देते, उसका जो है ना, जैसा हर साल उष्णता बढते जा रहा है तापमान बढतेजा रहा है और बिजली का और थंडस्ट्राम है, सपोज काफी सारा जो उसका दुर्घटना बढते जा रहा है इससे जो जनता को बचाने के लिए अपना जो प्रादेशिक केंद्र नागपूर ट्वेंटी फोर काम करते.*

हवामानाशी संबंधित पूर्व सुचनेतील अंतर एकत्र येऊन कमी करणे या विषयावर व्याख्यानाचे आयोजन देखील करण्यात आले. यावेळी वैज्ञानिक डॉ.रिजवान अहमद, वैज्ञानिक श्रीकांत टी.एस.,वैज्ञानिक डॉ.प्रविण कुमार यांनी भेट देण्यासाठी आलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

-----------------------------

मनपा बेटी बचाओ-बेटी पढाओ

नागपूर महानगरपालिकातर्फे 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या संकल्पनेला पाठबळ देण्याकरीता मनपा शाळांध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींना प्रत्येक वर्षी ४ हजार रुपयांची आर्थिक मदत केली जाणार आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.अभिजीत चौधरी यांनी सादर केलेल्या अर्थसंकल्पात 'बेटी बचाओ-बेटी पढाओ' या संकल्पनेद्वारे महापालिका शाळांमधील मुलींचा टक्का वाढावा यासाठी ही विशेष तरतूद केली आहे. महानगरपालिका शाळांध्ये शिकणारे बहुतांश विद्यार्थी आर्थिक दुर्बल घटकातील असतात. शाळांमध्ये मुलींचे प्रमाण वाढावे, त्यांना शिकतांना कोणतीही अडचणी येऊ नये म्हणून मनपा शाळांमध्ये इयत्ता १ ते १२ वीमध्ये शिक्षण घेत असलेल्या आणि ८० टक्केच्या वर उपस्थिती असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यीनीना थेट त्यांच्या खात्यावर प्रतिवर्षी ४ हजार रुपये पैसे जमा केले जाणार आहे.

-----------------------------

भारतरत्न शिफारस

क्रांतीसुर्य महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस केंद्रशासनाकडे करण्याचा ठराव आज महाराष्ट्र विधानसभेत एकमताने मंजूर झाला. राज शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी मांडलेला हा ठराव एकमताने मंजूर झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना जगद्‌गुरु संत श्री तुकाराम महाराज पुरस्कार मिळाल्याबद्‌दल त्यांचं अभिनंदन करणारा ठरावही आज विधानसभेत मंजूर झाला.

-----------------------------

८८ टीबी रुग्णांचे निदान

रुग्णालयात येणाऱ्या क्षयरोग रुग्णाविषयी डॉक्टरांनी संवेदनशील असण्याची गरज असल्याचे प्रतिपादन महानगरपालिका वैद्‌यकिय आरोग्य अधिकारी डॉ. दिपक सेलोकर यांनी केले. मनपा मुख्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहामध्ये आज केंद्र शासनाच्या राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रम प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियानाच्या अंतर्गत 100 दिवसीय क्षयरोग दुरीकरण मोहिम तसेच 24 मार्च रोजीच्या जागतिक क्षयरोग दिनानिमित्त नागपूर महानगरपालिकेद्‌वारे राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

----------------------------